सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १७/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. संजय आर हरितवाल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा भूमापक (अति/निष्का) बांद्रा-२**
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, बांद्रा-२,
नवीन प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, पहिला मजला,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी**
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, बांद्रा-२,
नवीन प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, पहिला मजला,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १४.०५.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १४.०५.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

तक्रारकर्ता यांनी मुळ माहिती अर्ज दि. १८.१०.२०१८ नुसार ६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. आयोगाने दि. १९.१२.२०१८ च्या आदेशान्वये जन माहिती अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात आलेले होते की, त्यांनी दि. ०७.०१.२०१९ पर्यंत या प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती प्रमाणित करुन अपिलार्थींना विनामुल्य द्यावी, या आदेशासह अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.

तक्रारकर्ता यांनी माहिती न मिळाल्याने दि. ११.०१.२०१९ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज सादर केला आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगाच्या अभिलेखावर जन माहिती अधिकारी यांचे दि. ०९.०४.२०१९ रोजीचा अहवाल उपलब्ध आहे. जे की सुनावणी दरम्यान संबंधीताच्या निदर्शनास आणले. सदर अहवालामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कळविले आहे की, दि. १८.१०.२०१८ रोजीची अर्जानुसार दि. ०९.०४.२०१९ रोजी अपेक्षिलेली माहिती साक्षांकित करुन श्री. संजय हरितवाल यांच्या वतीने श्री. खान एम. मोहम्मद यांना देण्यात आलेली माहिती बाबतची पोहोचपावती सोबत जोडली आहे. श्री. खान मोहम्मद उपस्थित असून त्यांचे म्हणणे की, त्यांना त्यांचे मुळ माहिती अर्जामधील मुद्दा क्र. ५ व ६ ची माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्दा क्र. ५ व ६ हे मुद्दा क्र. १ शी निगडीत दिसते आणि मुद्दा क्र. १ ची माहिती संबंधीतास देण्यात आलेली आहे.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, आयोगाचे आदेश दि. १९.१२.२०१८ नुसार उपलब्ध असलेली माहिती तक्रारकर्त्यास देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

31-5-2024.

**मुंबई**
**दिनांक : ३१.०५.२०२४**

State Information Commission
Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**